Peer Reviewed Refereed Journal ISSN : 2278 – 5639
Global Online Electronic International Interdisciplinary Research Journal (GOEIIRJ)
{Bi-Monthly} Volume – XII Issue – V September - October 2023

# आंतरराष्ट्रीय स्तरावरील प्रौढ शिक्षणाचा अभ्यास

**प्रा. डॉ. नंदकिशोर आनंदराव खिल्लारे**
त्रिमूर्ती ग्रामीण महिला अध्यापक महाविद्यालय,
नेवासा, ता. नेवासा, जि. अहमदनगर.

## प्रस्ताविक :

शिक्षण हा मानवी अविभाज्य असा घटक आहे. शिक्षणाशिवाय व्यक्ती स्वतःचा, कुटुंबाचा, समाजाचा, राष्ट्राचा विकास करू शकत नाही. शिक्षणानेच व्यक्तीच्या सर्वांगीण विकास होत असतो. शिक्षण नसेल तर व्यक्ती इच्छा असून देखिल प्रगती करू शकणार नाही. भारतातील शिक्षणाचा अभ्यास केला असता असे दिसून येते की, भारतामध्ये निरक्षरांची संख्या मोठ्या प्रमाणात आहे. ती जर कमी करायची असेल तर साक्षरता मोहीम, प्रौढ शिक्षणाची अत्यंत आवश्यकता आहे. प्रौढ शिक्षणाशिवाय राष्ट्रातील निरक्षरता कमी करता येणार नाही ही तेवढीच सत्याता आहे.

Global Online Electronic International Interdicipilinary Research Journal's licensed Based on a work at http://www.goeiirj.com

प्रसिद्ध शिक्षणतज्ञ जॉर्ज अँडसन यांनी असे म्हटले आहे की, आजच्या परिस्थितीत प्रौढ शिक्षणाची प्रगती करण्यात येणार अपयश हे अपरिहार्यपणे निरक्षरता नष्ट करण्याच्या अपयशान फलद्रुप होणारे ओहे. भारतासारख्या विकसनशील देशात प्रौढ शिक्षण आवश्यक आहे. तसेच ते भारतासारख्या इतर देशात सुद्धा प्रौढ शिक्षणाची काय स्थिती आहे ह्याचा अभ्यास या संशोधन पेपरमध्ये करण्यात आला आहे.

जागतिक पातळीवरचा विचार केला असता असे दिसून येते की प्रौढ शिक्षण क्षेत्रात प्रामुख्याने अफगणिस्तान, बर्गा, बांगलादेश, इंग्लंड, नेपाळ या देशात संशोधन कार्य झालेले आहे.

Peer Reviewed Refereed Journal ISSN : 2278 – 5639
Global Online Electronic International Interdisciplinary Research Journal (GOEIIRJ)
{Bi-Monthly} Volume – XII Issue – V September - October 2023

**१) अफागाणिस्तान :**

अफगाणिस्तान ह्या राष्ट्राचा अभ्यास केला असता असे दिसून येते की, अफगाणिस्तानचे लोक राष्ट्रीय विकासात सक्रिय सहभागी होते. म्हणून त्यांच्या लवकरच लक्षात आले की, सामाजिक आणि आर्थिक प्रगती मधिल निरक्षरता हा एक अडथळात्मक घटक आहे आणि तो आपण दूर करायला हवा.

अफगाणिस्तान ह्या राष्ट्राच्या अभ्यासातून असे लक्षात येते की १९८१ च्या जनगणनेनुसार अफगाणिस्तानची लाकसंख्या १५.४ दशलक्ष होती. त्यापैकी ४.६ दशलक्ष लोक १५-२० वर्ष वयोगटातील निरक्षर होते.

साक्षरता निर्मूलनासाठी अफगान सरकारने मोहिम सुरू केली. त्याची उद्दिष्टे-

१. संख्याविष्यक कौशल्य आणि साक्षरतेची मुळ कल्पना विदित करणे.

२. नागरी जाणीवा आणि राजकीय विकास करणे.

३. कौटुंबिक आयुष्य, आरोग्य आणि मुलांची काळजी याविषयी ज्ञान देणे.

४. तांत्रिक आणि शेतीविषयक कौश्ल्य देणे.

अफगाणिस्तान देशातील साक्षरता मोहिमेत भाषा आणि गणित यांना सामाजिक, आर्थिक दृष्टिकोणातून एकत्रित करणे हा प्रमुख उद्देश होता. पद्धतीमध्ये भाषाची रचनात्मक पद्धती वापरात आणली होती. भाषिक रचनात्मक पद्धतीचे प्रमूख बाह्या स्वरूप असे होते की, प्रौढांना शिकण्याच्या सुरवातीला अर्थपूर्ण संदेशाला सामोरे जावे लागते म्हणून त्यांना भाषिक रचनात्मक कौशल्य संपादन करण्यास प्रौत्साहन देणे काही घटकांची ओळख शिकणाऱ्याला व्हावी.

अफगाणिस्तान भाषेतील खरी वस्तूस्थितीशी रचनात्मक पद्धती सवलती पूर्ण होती. शिकणाऱ्यांना योग्य उच्चार करून त्यांना परस्पर व्यवहार करण्यासाठी ध्वनी आणि अक्षर याची आवश्यकता आहे. त्यासाठी प्रौढ शिक्षण कार्यक्रमात भाषिक कौश्ल्य विकसित करण्यासाठी प्रामुख्याने उपक्रम देण्यात आला.

**२) बर्मा :**

बार्मामध्ये शिक्षण हे पारंपारिक मठामधून दिल्या जात असे त्यामध्ये राजे, मध्यम वर्ग, आणि गरीब या सर्वांना मूक्त शिक्षणातून समाज शिकण्याचा हक्क होता. बर्मामधिल शिक्षणात स्वातंत्र्यानंतर शिक्षणातील एक नवीन पद्धत पुढे मांडली शिक्षणात विस्ताराने वाढ करण्यात आली. कार्यक्रमात निरक्षरतेचे निर्मूलन करण्यासाठी सुरूवात झाली. आणि त्याला समूह शिक्षण असे संबोधण्यात आले.

बर्मामधिल साक्षरता चळवळीचे प्रमुख उद्दिष्टे पुढील प्रमाणे होते.

१. निरक्षरांना वाचनासाठी आणि लिहण्यासाठी मदत करणे.

२. प्रगत सामाजिक आयुष्यात कृतिशील सहभागासाठी निरक्षरांना धैर्यशील बनविणे.

३. निरक्षरामध्ये उत्पादन क्षमता पातळी आणि त्यांचे जीवमान उत्पन्न करणे.

४. संपूर्ण लोकसंख्येची शैक्षणिक पातळी वाढविणे.

अशा प्रकारे बर्मामधिल प्रौढ शिक्षणाची उद्दिष्टे होती.

**३) बांगलादेश :**

बांगलादेश सरकारने असे जाहीर केले की, राष्ट्रीय क्रांतीच्या दुसऱ्या टप्प्यात निरक्षरतेचे निर्मूल करणे २१ फेब्रुवारी १९८० मध्ये साक्षरता कार्यक्रमास सुरूवात झाली होती. आणि ३१ डिसेबर १९८० मध्ये शेवट झाला. कार्यक्रमाचे उद्दिष्टे असे होते की, ११ ते ४५ वयोगटातील १० दशलक्ष प्रौढ स्त्री आणि आणि पुरूष यांच्यामध्ये साधे वाचणे, लिहणे आणि हिशोब करणे हे कौशल्य संपादन करणे. कार्यक्रमाचे उद्दिष्ट समोर ठेवून बांगलादेशातील सरकारने असे ठरविले की, मायमनसिंग जिल्ह्यातील कोठावली ठाना येथे अमलात आणलेल्या कार्यक्रमाचे मूल्यमापन करणे. मुल्यपानाचे उद्दिष्ट पुढील प्रमाणे होते.

१. नव साक्षरांनी त्यांनी शिकलेल्या वाचन, लेखन आणि आकडे मोड या कौश्ल्यांचे संपादन तपासने.

२. साक्षर शिक्षण प्राथमिक साक्षर आणि इतर शैक्षणिक सुविधा यांची माहिती गोळा करणे.

३. अमंलात आणलेल्या ह्या कार्यक्रमाचे विविध भागाची तपासणी करणे.

**४) इंग्लंड :**

इंग्लंड मधिल राष्ट्रीय मुरभूत शैक्षणिक संशोधन या संस्थेने एक संशोधन प्रकल्प घेतला. संशोधनाचा विषय होता प्रौढ साक्षरता योजनेतील संपादन केलेले शिक्षणात्मक कौशल्ये आणि अध्ययन कर्त्याचा विकास - एक पाहणी. पाहणीचा हेत पुढीलप्रमाणे आहे.

१. प्रयत्न कौशल्याच्या पातळीसंबंधी माहिती मिळविणे आणि प्रौढ शिक्षण कार्यक्रमातील राष्ट्रांनी उपस्थित केलेल्या प्रौढांना सुरूवातीच्या अवस्था शिकणाऱ्यामध्ये संपादन करणे हा हेतू ठेवला.

२. प्रौढांना वर्षात शिकविल्या जाणाऱ्या अभ्यासक्रमात त्यांना मोजण्याची पद्धती योजने, त्या द्वारा प्रौढामध्ये सुधारणा अणि प्रगती अजमवता येईल.

**५) नेपाळ :**

१९५२ या वर्षात काठमांडू यंथिल त्रिभूवन विद्यापीठातील संशोधन केंद्राने शिक्षणातील नवीन बदल आणि विकास यासाठी संशोधन अभ्यास हाती घेतला. संशोधन अभ्यासाचे हेतू पुढीलप्रमाणे.

१. साक्षरतेमध्ये (वाचणे, लिहणे, आणि आकडेतोड करणे) या पातळीचे सहभाग घेणाऱ्या लोकांचे संपादन निश्चित करणे.

२. सहभाग घेणाऱ्यांनी संपादन केलेल्या प्रकारचा तौलनिक अभ्यास करणे. त्यांच्यात मूलभूत फरक लिंग, भाषा, आणि भैगोलिक सृष्टि याचा तौलनिक अभ्यास करणे.

३. कार्यक्रमाचा विस्तार शेती, आरोग्य, आरोग्य रक्षण, कुटुंब नियोजन अणि सामाजिक कल्याण या क्षेत्राशी कसा झाला. सहभाग घेणाऱ्याकडून ते एकरूप कसा झाला, असे परिक्षण करणे.

अशाप्रकारे जागतिक पातळीवर संशोधन कार्य झालेले आहेत.

**सारांश :**

भारत देश असो वा जागतिक पातळीवरील कोणताही देश असो सामाजिक आणि आर्थिक प्रगतीमधिल निरक्षरता हा मुख्य घटक आहे. आणि राष्ट्राचा विकास करायचा असेल तर प्रौढ शिक्षण किंवा साक्षरता हा कार्यक्रमच प्रभावी ठरू शकतो. सर्व राष्ट्रातील संशोधनावरून असे लक्षात येते की, राष्ट्रीय विकासात साक्षर लोक मोठ्या प्रमाणात हातभार लावतात. त्या प्रमाणात निरक्षर लोक कमी प्रमाणात. त्यामुळे अफगाणिस्तान सरकारने साक्षता निर्मूलनासाठी एक मोहीम सूरू केली आहे. त्यामध्ये प्रामुख्याने भाषा आणि गणित यांना सामाजिक आर्थिक दृष्टिकोनातून एकत्रित करणे हा प्रमूख उद्देश होता.

प्रौढांना शिकण्याच्या सुरूवातीला अर्थपूर्ण संदेशाला सामोरे जावे लागते म्हणून त्यांना भाषिक रचनात्मक कौशल्य संपादन करण्यास प्रोत्साहन देणे. बर्मामध्ये तर मुलांना पारंपरिक मठातून शिक्षण दिले जात असे. त्यामध्ये सर्वांना समान संधी देण्यात येत असे. बर्मामध्ये निरक्षरता हटविण्यासाठी समूह शिक्षण दिल्या जात असे. त्यामध्ये निरक्षरांना धैर्यशिल बनविल्या जात असे. त्याठिकाणी लोकसंख्येची शैक्षिणिक पातळी वाढविण्यासाठी प्रयत्न केले जात होते.

बांगलादेशातील सरकारने असे जाहीर केले की. राष्ट्रीय क्रांतीच्या दुसऱ्या टप्प्यात निरक्षरतेचे निर्मूलन करणे. बांग्लादेश मध्ये तर दहा महीन्यात सर्व साक्षरता कार्यक्रम यशस्वी झाला. त्यांच्या मध्ये साधे वाचणे, लिहणे आणि हिशोब करणे ही कौशल्ये १० लक्ष प्रौढ-स्त्री-पुरूष यांना अवगत केले.

इंग्लंड मधिल जे संशोधन आहे ते प्रौढ साक्षरता योजनेतील संपादन केलेले कौशल्य आणि अध्ययनकार्त्यांचा विकास यावर आधारित होते.

नेपाळ मधिल संशोधन हे काठमांडू येथील त्रिभूवन विद्यामीठातील संशोधन केंद्राने शिक्षणातील नवीन बदल आणि विकास यासाठी होते. अशा प्रकारे प्रौढ शिक्षणासंबंधी आंतरराष्ट्रीय पातळीवर संशोधने झालेली आहेत.

**संदर्भसूची :**

१. करंदीकर, सु. अ. (१९९३), 'प्रौढ शिक्षण', यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक, पृ. क्र. ४.

२. देशपांडे, के. ना. (१९९३), 'प्रौढ व निरंतर शिक्षण', यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक, पृ. क्र. १४.

३. दळवी, म. अ. (२००७), 'डायमंड सामाजिक ज्ञानकोश', नागपूर ग्रंथनिर्मिती मंडळ, नागपूर.

४. सोहोनी, बा. बि. (१९९३), 'प्रौढ शिक्षण', नूतन प्रकाशन, पुणे.

५. जोगळेकर, र. अ. (१९९२), 'प्रौढ शिक्षण', यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक.